# राजर्षी शाहू महाराजांचे दुष्काळ निवारणाविषयक कार्य : एक चिकित्सक परिक्षण

**डॉ. कैलाश फुलमाळी**
इतिहास विभाग प्रमुख
रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर
**मो. न.** 7972985559
Email : fulmali.kailash@gmail.com

---

*सारांश :*

*आज महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तरप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश इत्यादी भारतातील अनेक भागात मोठयाप्रमाणात दुष्काळ सदृष्य परिस्थीती दिसुन येत आहे. हे भारत देशाकरीता फारच गंभिर प्रकरण आहे. प्रशासनाद्वारे यावर विचार विमर्ष करून उपायही सुचविल्या गेले व काही उपाय राबविल्या सुध्दा गेले. परंतु ही सर्व वरवरची मलमपटटी होती, असेच दिसून येते. परंतू १०२ वर्षापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या करवीर राज्यात दुष्काळ निवारण विषयक जे क्रांतीकारी कार्य केले. ते आजच्या सरकारला सुध्दा मार्गदर्शक ठरू शकतात. करीता प्रस्तुत शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतीकारी दुष्काळ निवारणाविषयक कार्याची माहीती देवून निष्कर्ष सादर करीत आहे.*

बिजसंज्ञा : प्लेग, हुकूम, अन्नवस्त्र, गोधन, पाळणाघरे, सरसुभे, धान्य, मामलेदार

---

प्रस्तावना :

छत्रपती शाहू महाराज १८९४ साली वयाच्या विसाव्या वर्षी गादीवर आले, त्यानंतर ते स्वत: राज्यकारभाराची घडी नीट बसवीत असतानाच अवघ्या दोन–तीन वर्षात दुष्काळ व प्लेग अशा दोन मोठ्या संकटांना त्यांना तोंड द्यावे लागले. १८९६ ते १९०० या पाच वर्षाच्या काळात संपूर्ण दक्षिणेत या संकटांनी हाहाकार माजवून लाखो लोकांचा बळी घेतला. करवीर राज्यातही या संकटांनी प्रवेश केला. पण शाहू महाराजांनी या संकटांवर मात करण्याकरीता केलेल्या उपाययोजनांमुळे देशात इतरत्र झालेल्या जीवहानीपेक्षा कितीतरी पटीने कमी जीवहानी करवीर संस्थानात होऊ शकली. म्हणूनच शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणाकरीता केलेल्या क्रांतीकारी उपाययोजना आजच्या सरकारला सुध्दा मार्गदर्शक ठरू शकतात. अशा या दुष्काळ निवारण उपाययोजना खालीलप्रमाणे राबविलेल्या दिसून येतात.

उपाययोजना :

दुष्काळाची चाहूल लागताच शाहू महाराजांनी आपल्या संस्थानाच्या प्रमुख मुलकी व महसुली अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन सर्व महालांतून प्रत्यक्ष पाहणी दौरे काढले. आवश्यक त्या ठिकाणी जंगल खात्याच्या तसेच बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनाही त्यांनी बरोबर घेतले. राज्यात स्वतंत्र 'दुष्काळ विभाग' सुरू करून त्यावर सरसुभे भास्करराव जाधव यांच्यासारख्या तडफदार व कर्तबगार अधिकाऱ्याची नियुक्ती केली.[१] महालाच्या मामलेदारांना दुष्काळाचे अहवाल



Research Hub International Journal

तातडीने तयार करण्याचे हुकूम दिले. दुष्काळाचे समग्र चित्र डोळ्यासमोर उभे राहिल्यावर शाहू महाराजांनी त्यावर मात करण्यासाठी ज्या उपाययोजना केल्या त्याचे प्रामुख्याने दोन विभाग पाडता येतील. ते असे :

- तातडीने करावयाच्या उपाययोजना
- दीर्घकालीन मूलभूत स्वरूपाच्या उपाययोजना

तातडीने करावयाच्या उपाययोजनांमध्ये प्रामुख्याने माणसे व जनावरे यांचे प्राण वाचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा समावेश होत होता[२]. अशा उपाययोजनांपैकी काही महत्त्वाच्या खालीलप्रमाणे आहे :

अन्नधान्याची वितरण व्यवस्था :

महाराजांनी प्रथम आपल्या संस्थानातील सधन प्रजाजनांचे या कामी सहकार्य घेण्याचे ठरविले. सधन शेतकरी, शेठ–सावकार यांच्याकडून गरीब लोकांसाठी दरबारच्या यंत्रणेकडून धान्य गोळा करून त्याचे दुष्काळी भागात वितरण केले. [३]

म्हैसूरच्या महाराजांशी संपर्क साधून त्यांना मदतीचे आवाहन केले. त्याप्रमाणे म्हैसूरच्या महाराजांनी १८९६ पासून १९०० पर्यंत अशी चार वर्षे करवीर संस्थानाला अन्नधान्याची मदत केली.[४]

गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व अनाथालये :

महाराजांनी कटकोळ, पन्हाळा, वळीवडे, गडहिंग्लज, बाजारभोगाव इत्यादी ठिकाणी अनाथ, वृद्ध व निराधार लोकांच्यासाठी अनाथालये काढली आणि तेथे अन्नछत्रे सुरू केली. या दुष्काळात एकूण ५० हजार निराधारांना अन्नवस्त्र देऊन जीवदान दिले गेले.[५] दक्षिणेत शेकडो लोक अन्नाविना तडफडून मरत असताना करवीर संस्थानात मात्र कोणीही भूकबळी झाला नाही, ही कल्याणकारी राज्यकर्ता म्हणून महाराजांची मोठी कामगिरी समजली पाहिजे.

महाराजांनी आंधळे–पांगळे, म्हातारे, दीनदुबळ्यांचीही स्वतंत्र व्यवस्था केली होती. जे लोक मदत केंद्रावरही येऊ शकत नव्हते ते भुकेने तळमळून मरू नयेत, म्हणून त्यांना दरबाराकडून शिधा वाटण्याची पद्धत महाराजांनी सुरू केली. सारांश, अन्न मिळाले नाही म्हणून प्रजाजन भूकबळी पडले, असे कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, याकडे महाराज अत्यंत दक्षतेने पाहात होते.[६]

पाळणाघरांची योजना :

सरकारच्या दुष्काळी कामांवर हजारो स्त्री–पुरुष राबत असता, त्यांच्या तान्ह्या मुलांचे फार हाल होत असत. दुष्काळी कामावर पाहणी करीत असता या तान्ह्या मुलाचे आक्रोश पाहून महाराजांचे मन द्रवले व त्यांनी अशा कामांवर तातडीने पाळणाघरे उभारण्याचा हुकूम दिला. परिणामी दुष्काळी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे उभी राहिली. जेथे त्या मुलांची देखभाल करण्यासाठी सरकारतर्फे 'आया'ची नेमणूक झाली, अशा चार हजारांहून अधिक तान्ह्या मुलांना या योजनेचा लाभ झाला[७]. महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजनांतर्गत पाळणाघरे सुरू केल्याचे आपणास माहीत आहे. कोल्हापूरच्या या राजाने १०२ वर्षांपूर्वी आपल्या राज्यात पाळणाघरे सुरू केली होती. मला वाटते की देशातील पाळणाघरांचा हा पहिला सामाजिक प्रयोग असावा.[८]

दुष्काळग्रस्तांसाठी रोजगारनिर्मिती :

अन्नछत्रे, अनाथालये ही दीनदुबळ्या लोकांसाठी होती. धडधाकट लोकांसाठी रोजगाराची व्यवस्था लावणे गरजेचे होते. त्या दृष्टीने महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक कच्च्या व पक्क्या रस्त्यांच्या व पुलांच्या बांधणीच्या कामाच्या योजना सुरू केल्या. विशेष म्हणजे या योजनांत मजूर जसे काम करत तसे वेतन देण्याची, म्हणजे "Payment by result" या तत्त्वाने वेतन देण्याची पद्धती त्यांनी स्वीकारली.[९]

विशेष म्हणजे हे तत्त्व पुढे १९५१ साली जिनिव्हामध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेमध्ये स्वीकारले गेले.[१०] त्यापूर्वी ५० वर्षे करवीर संस्थानात शाहू महाराजांनी या शास्त्रीय तत्त्वाचा स्वीकार केल्याचे आढळते.

जनावरांच्या छावण्या :

प्रजाजनांमध्ये बहुसंख्य लोक शेतकरी होते; आणि त्यांचे जीवन, शेतीचे जीवन गोधनावर अवलंबून होते. दुष्काळामुळे या गोधनावर मोठे संकट आले. महाराजांनी प्रजेच्या जीविताबरोबर त्यांच्या जनावरांच्या जीवितांची विशेषत्वाने काळजी घेतली.[११] सरकारी गवताची कुरणे आणि जंगले रयतेसाठी खुली करण्यात आली. शिवाय त्यांनी जाहीरनामाच काढला की, ज्यांना आपली जनावरे पोसता येणे शक्य नाही त्यांनी ती सरकारी छावणीत दाखल करावीत आणि जेव्हा परत न्यावीशी वाटतील तेव्हा ती न्यावीत. यामुळे संस्थानातील गोधन केवळ वाचलेच नव्हे तर त्यांचे संवर्धनही झाले. दुष्काळाच्या सुरुवातीला सरकारी छावणीत ४ लाख २७ हजार ६२९ एवढी जनावरे होती, त्यात वाढ होऊन त्यांची संख्या ४ लाख ३४ हजार ९४९ इतकी झाली.[१२] इंग्रजांच्या खालसा मुलखात हजारो माणसे व लाखो जनावरे मृत्युमुखी पडत असता, शाहू महाराजांच्या संस्थानात माणसे तर जगलीच पण जनावरेही जगली, एवढेच नव्हे तर त्यांच्यात वाढ झाली.

निष्कर्ष :

अशाप्रकारे करवीर संस्थानावर कोसळलेल्या दुष्काळाच्या अस्मानी संकटाला मोठ्या धैर्याने व कल्पकतेने शाहू महाराज सामोरे गेल्याचे दिसते. एवढेच नव्हे तर दुष्काळाशी सामना करीत असता विविध प्रकारच्या तातडीच्या उपाययोजना करून त्यांनी लाखो लोकांचे व जनावरांचे प्राण वाचवून दुवा तर घेतलाच, शिवाय दुष्काळानंतर दीर्घकालीन उपाययोजना हाती घेऊन करवीर संस्थानातून दुष्काळाची कायमस्वरूपी हकालपट्टी केली आणि आपली भूमी खऱ्या अर्थाने सुजलाम्, सुफलाम् केली. स्वातंत्र्यानंतर बऱ्याच वर्षांनी आपल्या सरकारने हरितक्रांतीची योजना तयार केली व ती बऱ्याच अंशी यशस्वीही झाली. पण अशी हरितक्रांती पाऊणशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात शाहू राजाने घडवून आणली होती, ही कोणाही मराठी माणसास अभिमान वाटावा अशी गोष्ट आहे. विशेषत: आज महाराष्ट्रात सांगली, सातारा, सोलापूर इत्यादी जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाले असताना कोल्हापूर जिल्ह्याचे नाव दुष्काळग्रस्तांच्या यादीत नाही, याचे श्रेय शाहू महाराजांना जाते, याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

संदर्भसूची :

- गोखले आर. एम., भारताचा आर्थिक इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७८, पृष्ठ क्र. ३९

- जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००२, पृष्ठ क्र. ३०६.
- जाधव भ. बा., आधुनिक भारतीय पुरोगामी राष्ट्रवादाचे जनक : राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, प्रकाश विश्वासराव लोकवाड्.मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००४, पृष्ठ क्र. १२०.
- जाधव भ. बा, राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, युनिव्हर्सल पब्लिकेशन, पहिली आवृत्ती, कोल्हापूर, १९७१ पृष्ठ क्र. ७
- पानसरे कॉ. गोविंद, राजर्षी शाहू : वसा आणि वारसा, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, २००८, पृष्ठ क्र. २८.
- पवार डॉ. जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपतीचे जाहीरनामे व हुकूमनामे, सुमेरू, प्रकाशन, डोंबिवली पूर्व, प्रथमावृत्ती २००६, पृष्ठ क्र. ३१
- कोल्हापूर पद्धतीच्या बंधारेविषयक टिप्पणी– महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, कोल्हापूर, पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर
- साळुंखे पी. बी., राजर्षी शाहू गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई १९७६, पृष्ठ क्र. ६९५.
- कुलकर्णी मीना, श्री शाहू छत्रपतीचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७५, पृष्ठ क्र. ७२.
- Reports on the General Administration of Kolhapur State, 1901-1902 to 1920-1921
- संगवे विलास, खणे बी. डी., राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, खंड–४, शाहू संशोधन केंद्र, कोल्हापूर, १९८३, पृष्ठ क्र. ७
- Pawar A.G., Rajarshi Shri Shahu Chhatrapati Papers, Vol. I, Shahu Research Institute, Kolhapur, 1978, pp. 16


Research Hub International Journal